# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक : 14.03.2024** **वार-गुरुवार**

---

1.मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी अद्ययावत मराठी भाषा धोरण राज्य मंत्रिमंडळाकडून जाहीर,

2.अहमदनगर शहराचं नामकरण अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यातल्या वेल्हे तालुक्याचं नामकरण राजगड करण्याच्या निर्णयावर राज्य मंत्रीमंडळाचं शिक्कामोर्तब,

3.राज्यातल्या 100 महाविद्यालयांत 'आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र' होणार सुरू आणि

4.रत्नागिरीतला आगळावेगळा कीर्तनमहोत्सव पेरतो देशभक्तीचं बीज.

**राज्य मंत्री मंडळ निर्णय**

मराठी भाषेचं जतन, संवर्धन, विकास, प्रचार आणि प्रसारासाठी लोकव्यवहाराचं मराठीकरण करण्याच्या उद्देशानं अद्ययावत मराठी भाषा धोरण राज्य मंत्रिमंडळानं काल जाहीर केलं. आगामी 25 वर्षांत मराठी भाषा ज्ञान आणि रोजगाराची भाषा म्हणून प्रस्थापित करणं, विज्ञान-तंत्रज्ञान, वैद्यक अशा विविध ज्ञानशाखांमधलं उच्च शिक्षण मराठी माध्यमात उपलब्ध करुन देणं, मराठी भाषेला नवतंत्रज्ञानानं सुसज्ज करणं, सर्वसामान्यांना समजेल अशी प्रशासकीय व्यवहाराची मराठी भाषा विकसित करणं, बोली भाषांचं जतन आणि संवर्धन तसंच मराठी भाषेला राष्ट्रीय आणि वैश्विक स्तरावर महत्वाची भाषा म्हणून प्रस्थापित करणं यासाठी विविध शिफारशींनुसार हे धोरण तयार करण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षण आणि मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर यांनी दिली.

या धोरणानुसार सर्व माध्यमांच्या पूर्वप्राथमिक आणि बालवाडी शिक्षणाच्या अभ्यासक्रमात मराठी अक्षरओळख अनिवार्य असणार आहे.

तसंच सर्व शासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषेतून संभाषण करणं सक्तीचं करण्यात येणार आहे. परदेशस्थ आणि राज्याबाहेरच्या अमराठी व्यक्तींना या नियमातून वगळण्यात आलं आहे. राज्यातल्या प्रवासी वाहनाचा चालक परवाना मिळवण्यासाठीही मराठीचं ज्ञान आवश्यक ठरणार आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

अहमदनगर शहराचं नामकरण अहिल्यानगर करण्यास मंत्रिमंडळानं मान्यता दिली. तसंच पुणे जिल्ह्यातल्या वेल्हे तालुक्याचं नाव बदलून राजगड असं करण्यात येणार आहे. वेल्हे तालुक्यात असलेल्या राजगडावरून छत्रपती शिवाजी महाराजांनी २७ वर्षं स्वराज्याचा कारभार पहिला होता. या व्यतिरिक्त मुंबईतल्या आठ उपनगरी रेल्वेस्थानकांची ब्रिटिशकालीन नावं बदलण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आलं.

लहान शहरांमधली अग्निशमन सेवा केंद्राच्या सहाय्यानं बळकट करण्यात येणार आहे आणि यासाठी राज्याच्या 153 कोटी रुपयांच्या हिश्श्याला या बैठकीत मान्यता देण्यात आली. पोलीस पाटील, आशा स्वयंसेविका आणि मानद वैद्यकीय अध्यापकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला आहे.

राष्ट्रीय आरोग्य विभागातल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत घेण्यात येणार आहे आणि हजारो कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार आहे.

शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी वीज वितरण प्रणालीचं सक्षमीकरण करण्यात येणार आहे. यासाठीच्या 11 हजार 585 कोटी रुपयांच्या प्रकल्पालाही कालच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली.

मुंबईतल्या उत्तन ते विरार सागरी सेतू मार्गास मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे आणि मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेत 23 हजार किलोमीटरचे रस्ते बांधण्याचं नियोजनही करण्यात आलं आहे. यातले दहा हजार किलोमीटर लांबीचे रस्ते या वर्षात बांधण्यात येणार आहे.

पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास विभागाची पुनर्रचना करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**बालभारती**

बालभारतीतर्फे इयत्ता तिसरी ते बारावीच्या नागरिकशास्त्र, राज्यशास्त्र आणि प्रशासन विषयाच्या पाठ्यपुस्तकातल्या संकल्पना सोप्या भाषेत सचित्र उदाहरणासह स्पष्ट करण्यासाठी कोश आणि ऐतिहासिक बोधपर कथामालेच्या तीन भागांचं प्रकाशन काल राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत करण्यात आलं.

ऐतिहासिक घटनांच्या साखळीमागचे कार्यकारण संबंध समजावून सांगणं, घटनांचं विश्लेषण वस्तुनिष्ठपणे करणं, विषयाची समज आणि आवड निर्माण करणं आणि वाचन संस्कृती वृद्धिंगत करणं हे उद्दिष्ट ठेवून ऐतिहासिक कथामालेचे हे पाठ्येतर भाग तयार करण्यात आले आहेत.

**कौशल्य विकास केंद्र**

देशाची अर्थव्यवस्था बळकट होण्यासाठी युवा पिढीनं शिक्षणाबरोबरच कौशल्यं प्राप्त करणं, ही काळाची गरज आहे, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत केलं. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागामार्फत राज्यातल्या 100 महाविद्यालयांत कौशल्य विकास केंद्रांचं उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. या केंद्रांना ‘आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र असं नाव देण्यात आल्याची घोषणा फडणवीस यांनी केली. राज्यातल्या एक हजार महाविद्यालयांमध्ये ही केंद्र टप्प्याटप्प्यानं सुरू होणार आहेत.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या दृष्टिकोनातून महाविद्यालयीन शिक्षणासह व्यावसायिक कौशल्यं विकसित करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. प्रत्येक कौशल्य विकास केंद्रातून किमान दीडशे आणि राज्यातल्या किमान वीस हजार युवक-युवतींना याद्वारे कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या कौशल्य विकास केंद्रातून प्रशिक्षणासाठी 200 ते 600 तासांपर्यंत सुसंगत अभ्यासक्रमांची निवड करण्यात येणार आहे.

**देशभक्तीचे धडे देणारा कीर्तन महोत्सव**

रत्नागिरीत 9 मार्चला सुरू झालेल्या कीर्तनसंध्या महोत्सवाचा आज समारोप होत आहे. प्रभावीपणे समाजप्रबोधन करणाऱ्या या महोत्सवाचं यंदा तेरावं वर्ष होतं. हा महोत्सव केवळ धार्मिकतेशी निगडित नाही, तर राष्ट्रविचारांचं बीज पेरण्याचं कार्य करत आहे. या महोत्सवाच्या वेगळेपणाविषयी अधिक माहिती देत आहेत आमचे रत्नागिरीचे प्रतिनिधी...

सध्या समाज प्रबोधनाची असलेली गरज आणि त्यासाठी कीर्तन या माध्यमातली ताकद ओळखून रत्नागिरीतल्या काही तरुणांनी 2012 पासून कीर्तनसंध्या महोत्सवाची सुरुवात केली. व्यासंगी राष्ट्रीय कीर्तनकार हरिभक्तिपरायण विद्यावाचस्पती चारुदत्तबुवा आफळे यांच्या ओजस्वी वाणीतून दर वर्षी इतिहासाची एकेक पानं रत्नागिरीकरांसमोर उलगडू लागली. संत आणि राष्ट्रपुरुषांची चरित्रं, तसंच भारतीय स्वातंत्र्ययुद्धापासून कारगिलच्या युद्धापर्यंतचे अनेक विषय या महोत्सवात हाताळण्यात आले. राममंदिर उभारणीच्या पार्श्वभूमीवर यंदा महोत्सवात रामकथा आणि गीतरामायण सादर झालं. श्रीरामांनी विविध समाजघटकांमध्ये मैत्रीचे सेतू बांधून देशविघातक शक्तींचं निर्दालन कसं केलं, याचं रसाळ निरूपण बुवांनी केलं. आजच्या काळात तरुणांनी शक्तीची उपासना करणं, अभ्यासातून समाजातले गैरसमज दूर करणं, मतदानाचा हक्क सुज्ञपणे बजावणं, एकीची भावना बळकट करणं कसं आवश्यक आहे, यावर रामकथेच्या अनुषंगाने बुवांनी भाष्य केलं. प्रामुख्याने तरुण, तसंच लहान मुलांसह सर्व वयोगटांमधल्या सुमारे चार-पाच हजार जणांच्या उपस्थितीने मैदान भरून गेलेलं असतं. चार तासांच्या रोजच्या कार्यक्रमाची सांगता 'वंदे मातरम्'ने होते. समाजोपयोगी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मानही महोत्सवात केला जातो. या आगळ्यावेगळ्या महोत्सवातून येणारं भारावलेपण निश्चितच प्रेरणा आणि ऊर्जा देतं, अशी प्रातिनिधिक भावना श्रोत्यांकडून व्यक्त केली जाते. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी.

**<u>सूरज</u>**

देशातल्या वंचित, मागासवर्गीयांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या उद्देशानं सुरू करण्यात आलेल्या पीएम सूरज पोर्टलचं लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल करण्यात आलं. राज्यात बीड, अहमदनगर, सोलापूर, ठाणे, धुळे इत्यादी विविध ठिकाणी व्यवसायिक आणि शैक्षणिक कर्ज योजनेच्या धनादेशांचं वाटप, स्वच्छता कामगारांच्या सरंक्षणासाठी वैयक्तिक संरक्षक संच, आयुष्यमान कार्ड यांचं वितरण करण्यात आलं. पंतप्रधानांनी यावेळी योजनेच्या लाभार्थींशी दूरस्थ पद्धतीनं संवाद साधला.

**<u>इंटरसेप्टर नवी वाहने</u>**

महाराष्ट्र अपघातमुक्त करण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचा उपयोग आधुनिक वाहतूक व्यवस्थापन प्रणालीमध्ये करण्याचं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल केलं. परिवहन विभागाच्या 187  इंटर सेप्टर वाहनांच्या लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते. या वाहनांच्या मदतीनं वाहतुकीचे नियम तोडणाऱ्या आणि वेगमर्यादा ओलांडणाऱ्या वाहनांचा शोध घेणं परिवहन विभागाला शक्य होणार आहे. रात्री होणारे अपघात टाळण्यासाठी प्रत्येक नाक्यांवर वाहन चालकांची तपासणी करण्यात यावी आणि चालकांमध्ये जागृती निर्माण केली जावी, असंही शिंदे यावेळी म्हणाले.

**<u>भूमि पूजन</u>**

भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयाच्या इमारतीचा भूमिपूजन सोहळा काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं पार पडला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यासह मंगेशकर कुटुंबीय या कार्यक्रमाला उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असं संगीत महाविद्यालय देशात असावं या उद्देशानं राज्य शासनानं हे महाविद्यालय उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

**<u>हवामान</u>**

राज्यात काल सर्वाधिक कमाल तापमान मालेगाव इथं 40 अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. राज्यात सर्वत्र हवामान कोरडं आहे आणि येत्या दोन दिवसात त्यात बदल होण्याची शक्यता नाही.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार